# १५ . आनंद

मित्रांनो आज मी तुम्हाला एका लहान मुलाची मोठी गोष्ट सांगणार आहे . त्या छोटया मुलाचे नाव आहे ' आनंद' . नावाप्रमाणे आनंदी व समाधानी आहे . एवढेच नव्हे तर हुशारही आहे . वेगवेगळया परिक्षांना बसतो व बक्षिसे मिळवितो . मैदानी खेळही आवडीने खेळत असतो . आनंद ६ व्या इयत्तेत शिकत आहे . योगायोगाने आनंद माझा नातू आहे . माझ्या पुतण्याचा मुलगा . मित्रांनो माझ्या कुटुंबातला म्हणून मी तुम्हाला आनंदची गोष्ट सांगत नाहीये तर मला आलेला अनुभव तुम्हाला सांगितल्याशिवाय रहावतच नाही म्हणून हा लेख .

आनंद नुकताच बीएआरसी च्या बाल वैज्ञानिक परिक्षेला बसला होता . लेखी परिक्षेत यश मिळाले . त्यामुळे प्रयोगाच्या परिक्षेसाठी निवड झाली . प्रयोगाची परिक्षाही चांगली झाली पण मुलाखातीसाठी निवड होऊ शकली नाही . त्याच्या वर्गातील १६ मुले प्रयोगाच्या परिक्षेसाठी निवडली होती त्यापैकी ६ मुलांना मुलाखातीसाठी निवडले गेले . म्हणजे ह्या ६ मुलांना रौप्य पदक नक्की झाले . मुलाखत चांगली झाली तर सुवर्ण पदक मिळू शकेल .

आनंदला मुलाखातीसाठी निवडले जाईल अशी अपेक्षा होती . जर का निवड झाली तर तो मुलाखातीच्या सरावासाठी व मुलाखत कशी द्यावी ह्याचे मार्गदर्शन घेण्यासाठी माझ्याकडे येणार होता . मला सुद्धा त्याच्या निकालची उत्सुकता होती . गौरवला त्याच्या मोठया भावाला मी मुलाखातीसाठी मार्गदर्शन केले होते . गौरवला सुवर्णपदक मिळाले होते व तीच अपेक्षा सर्वांची आनंदकडून होती .

नुकताच रिझल्ट लागला . आनंद मला मैदानात भेटला व त्याने निकालाबद्दल जी प्रतिक्रिया दिली त्याचीच ही गोष्ट आहे . आनंद म्हणाला आजोबा वर्गातल्या १६ मुलांपैक्षा ६ मुले मुलाखातीसाठी निवडली गेली . पण ही मुले खरेच ग्रेट होती . खूप हुशार आहेत . बाबा म्हणाले कि आनंद ही काही आयुष्यातील शेवटची परिक्षा नाही .

खरेतर आनंद प्रतिक्रिया म्हणून ४ वाक्येच बोलला पण हे बोलताना त्याचा आवाज , चेह–यावरचे भाव इतके सच्चे होते की ते मी तुम्हाला शब्दात वर्णन करून सांगूच शकत नाही .

त्याच्या आवाजात मित्रांच्या हुशारीचा अभिमान होता . आपण निवडले गेलो नाही ह्याचे दुःख नव्हते . परंतु आपल्यापेक्षा मित्र हुशार होते हे सत्य त्याने पचविले होते . निवडी बद्दल कोणत्याही प्रकारची शंका , मत्सर त्याच्या आवाजात , चेह–यावर नव्हता तर मित्रांबद्दल अभिमान होता . आपण निवडले गेलो नाही म्हणून कोणत्याही प्रकारचा न्यूनगंडही नव्हता . बघता बघता लहान आनंद मला खूप मोठा झाला असे वाटले . खरेतर त्या क्षणी तो एवढा मोठा होता की बाबांनी ' ही काही आयुष्यातील शेवटची परिक्षा नाही' असे समजावयाची सुद्धा त्याला गरज नव्हती .

आनंद मला तुझा अभिमान वाटतो. म्हणूनच तुझी गोष्ट मी इतरांना सांगणार आहे. खूप मोठ हो. उच्चशिक्षण घे व हा मनाचा साधेपणा टिकवून ठेव म्हणजे तुझ्या आयुष्यातील यशाला वेगळेच परिमाण मिळेल.

मित्रांनो गोष्ट ऐवढीच आहे. पण किती छान वागला माझा आनंद ? जे मोठयांना जमत नाही , उमजत नाही त्यांच्यासाठी त्याचे वागणे हे मार्गदर्शक असे आहे.

आपल्याला लहान मूल आवडते कारण ते निरागस असते. कोणतेही विकार ते अजून शिकवेले नसते. कोणाकडेही बघून खुदकन हसते.ही निरागसता मूल जसे मोठे होते तशी कमी कमी होते. मोठयांचे अनुकरण केले जाते व मोठयांचे विकार ( राग , मत्सर , लोभ ,स्वार्थ , खोटेपणा ) लहानपणीच शिकले जातात. बरेच वेळा ह्यासाठी मोठयांचे लहान मुलांसमोरील वागणे कारणीभूत असते. हल्लींच्या संगणकयुगात मुले ही कॉपी कॅट असतात. कशाची कॉपी करावी हे कळायचे त्यांचे वय नसते व त्यामुळेच त्यांचा निरागस स्वभाव कधीच मावळतो.

ह्या पार्श्वभूमीवर आनंदचे वागणे माझ्या मनात भरले. आज १२ व्या वर्षी सुद्धा त्याच्या मनाचा साधेपणा टिकून होता. हा निरागसपणा समाजातील प्रत्येकाने शिकला तर काय मजा येईल नाही ?